JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# प्रादेशिक विस्तारानुसार मराठा साम्राज्यातील किल्ल्यांचे महत्त्व

**अमितकुमार गणेश शिंगणे**
**संशोधक विद्यार्थी**
**एम. इ. एस. कॉलेज मेहकर,**
**जिल्हा बुलढाणा.**

**प्रस्तावना -**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महत्त्वाचे साम्राज्य म्हणजे शिवाजी राजे भोसले यांनी निर्माण केलेले मराठा साम्राज्य होय. मराठा साम्राज्य हे शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वाने, बुद्धीचातुर्याने आणि सामर्थ्याने जसे अजरामर झाले तसेच ते त्यांच्या गडकिल्ल्यामुळे देखील झाले. शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तुत्वाची साक्ष देत आजही त्यांनी बांधलेले किल्ले स्वराज्यात म्हणजेच आजच्या महाराष्ट्र मोठ्या अभिमानाचे उभे आहे. शिवाजी महाराजांनी जेवढे किल्ले स्वराज्यात बांधले आणि डागडूजी करून पुनरुज्जीवित केले तेवढे किल्ले कदाचितच कुण्या एका राजाने आपल्या साम्राज्यात केले असेल त्यामुळे शिवाजी महाराजांना काही इतिहासकार 'दुर्ग प्रेमी राजा' आणि काही इतिहासकार 'दुर्ग वेडा राजा' देखील म्हणतात. त्यांचे दुर्ग प्रेम हे सर्वश्रुत आहे. 'सर्व राज्यांचे सारं ते दुर्ग' हे तत्कालीन काळातील गडकिल्ल्यांचे महत्त्व शिवाजी महाराजांनी ओळखले होते.

भारतात प्राचीन काळापासूनच किल्ले निर्मितीची कला माहित असल्याचे पुरातत्वीय अवशेष आणि वाड्मयीन साहित्यावरून, साधनावरून दिसून येते. शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले ते सह्याद्रीच्या प्रदेशात त्यामुळे सह्याद्रीच्या दुर्गमतेमुळेच मराठा साम्राज्य कणखर बनले असे म्हणता येईल. कारण सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांनी आणि त्यावर बांधलेल्या किल्ल्यांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे, महाराष्ट्राच्या जीवित, अब्रू व संस्कृतीचे रक्षण केले आहे. शिवाजी महाराजांनी सह्याद्रीचा प्रदेश मिळविल्यावर प्रथमतः त्यांनी सह्याद्रीच्या प्रत्येक घाटावर, महत्त्वाच्या जागेवर, फाट्यावर मजबूत असे किल्ले बांधले. ज्या ज्या ठिकाणी त्यांना अवघड जागा व पाण्याची सोय आहे असे दिसून आले त्या त्या ठिकाणी त्यांनी किल्ला बांधलाच. मोक्याची जागा त्यांनी किल्ल्या शिवाय रिक्त ठेवलीच नाही. त्यामुळेच वडिलोपार्जित जहागिरीच्या माध्यमातून जरी त्यांनी आपले पाय रोवले तरीही त्यांनी स्वराज्य स्वबळावर निर्माण केले. परंतु स्वराज्य निर्मितीमध्ये त्यांना वडिलोपार्जित जहागिरीचा निश्चितच फायदा झाला ज्यामुळे त्यांना स्वराज्याची बांधणी करणे सुलभ झाले. या स्वराज्य बांधणीमध्ये त्यांचावर सह्याद्रीचे फार मोठे उपकार आहे हे विसरून चालणार नाही. स्वराज्य निर्मितीत, बांधणीत ज्याचा मोलाचं वाटा आहे ते म्हणजे

स्वराज्यातील किल्ले. त्यामुळे स्वराज्यातील प्रादेशिक विस्तारानुसार किल्ल्यांचा अभ्यास आणि स्वराज्य विस्तारात किल्ल्यांच्या प्रकारानुसार असलेले गडकिल्ल्यांचे महत्त्व अभ्यासणे आवश्यक आहे.

**बिजशब्द -**

**मावळ -** घाटमाथ्याचाच पोटविभाग. यामध्ये पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेकडील पट्टयाचा समावेश होतो.

**देश -** कोकण व विदर्भ यांना जोडणारा प्रदेश.

**घाटमाथा -** घाट आणि माथा मिळून घाटमाथा हा शब्द तयार होतो. घाट अर्थात देश एकमेकापासून भिन्न करणारी पर्वताची रांग, डोंगर ओलांडून जावयाचा रस्ता, डोंगरावरील वाट.

**नेर -** नहर, पाण्याचा प्रवाह. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील पूर्वेकडील प्रदेश ज्यामधून नद्या वाहतात जेथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्या भागाला नेर अथवा मावळ म्हणतात.

**उद्दिष्टे -**

1. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य अभ्यासणे.
2. शिवकालीन मराठा साम्राज्याचा विस्तार जाणून घेणे.
3. मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये गडकिल्ल्यांचे महत्त्व अभ्यासणे.
4. मराठा साम्राज्याच्या प्रादेशिक विस्तारानुसार किल्ल्याचे प्रकार जाणून घेणे.
5. प्रादेशिक विस्तारानुसार गडकिल्ल्यांचे महत्त्व समजून घेणे.

**विषय विवेचन -**

महाराष्ट्र हा प्रदेश भारताच्या मध्यभागी असून त्यांच्या उत्तरेला गुजरात, मध्यप्रदेश, दक्षिणेला गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश या प्रदेशाचे सीमा असून पश्चिमेला अरबी समुद्र आहे. यामुळेच राजकीय, व्यापारी, लष्करी, शैक्षणिक, आर्थिक कारणामुळे प्राचीन काळापासून आजपर्यंत उत्तरेकडील लोकांचे दक्षिणेकडे आणि दक्षिणेकडील लोकांचे उत्तरेकडे महाराष्ट्रातून स्थलांतर होत असल्याने त्यांच्यामध्ये संस्कृतीची देवाणघेवाण होत होती. मराठा साम्राज्याचा भौगोलिकदृष्ट्या विचार करता, महाराष्ट्र हे दख्खन प्रदेशात मोडते. याच दख्खन प्रदेशाला दख्खन पठार असेही म्हणतात. दख्खन पठार बेसॉल्ट या खडकापासून बनलेला आहे आणि याच खडकामुळे सह्याद्री पर्वत रांगेत व अजिंठा, बालाघाट, महादेव या डोंगर रांगेत उंच कडे व माथ्यावर सपाट भाग असलेली ठिकाणे गिरदुर्ग बांधण्यासाठी निसर्गाचा उपलब्ध आहे. असंख्य कडेकपारीने वेढलेल्या नैसर्गिक ताशीव उभ्या कड्यांच्या माथ्यावरील सह्याद्रीच्या पठारावर चढणे कठीण असते. एकंदरीत सह्याद्रीची भूरचना ही स्वयंभू, संरक्षणक्षम आणि सामर्थ्यवान होती. याचाच वापर सातवाहन काळापासून तर मराठा साम्राज्यापर्यंतच्या राजांनी केलेला दिसून येतो.

मराठा साम्राज्याचा भौगोलिकदृष्ट्या विचार करण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे "भौगोलिक घटक इतिहासाच्या प्रवाहाची दिशा निश्चित करतो. तसेच नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवन यामध्ये एक अतूट नाते असते आणि इतिहास हा मानवी जीवनाचा विचार करीत असल्याने त्याला भूगोलाची आवश्यकता असते" असे स्टेपोक्रेस यांनी म्हटलेले आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांचे साम्राज्य आणि त्यांच्या साम्राज्यातील गडकिल्ल्यांचा प्रादेशिक दृष्टिकोनातून विचार केल्यास, भौगोलिकदृष्ट्या दख्खन प्रदेश वैशिष्टयपूर्ण असल्याचे दिसून येते.

**मराठा साम्राज्य विस्तार -**

मराठा साम्राज्य सन 1818 मध्ये ऱ्हास पावले म्हणजेच ते ब्रिटिशांच्या ताब्यात गेले आणि तेथे ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची बहुतांश साधने नष्ट केली. मराठा स्वराज्याची सीमा आणि स्वराज्यातील किल्ले या बाबतीत निश्चित माहिती उपलब्ध नाही. परंतु राज्याचा विस्तार किती असावा याचा अंदाज शिवकालीन सभासद बखर, पेशवे दफ्तरातील शाहू दप्तर मधील काही अप्रकाशित साधने व 18 व्या शतकाच्या सुरूवातीला मुघलांच्या माहितीसाठी तयार केलेला जाबिता (अहवाल) उपलब्ध असल्याचे त्याचा आधार घेवून स्वराज्याच्या विस्ताराबाबत अंदाज करता येतो. सभासद बखर व जाबिता यांचा विचार केल्यास शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत स्वराज्य विस्तार किती झाला होता हे समजते. मराठ्यांकडे किती मुलूख होता याची शहानिशा करण्यासाठी शंकराजी मल्हार या अधिकाऱ्याची निवड केली. यांनी सन 1717 मध्ये स्वराज्याचा जाबता (अहवाल) मोगल दरबाराला सादर केला. ज्याद्वारे स्वराज्याचे तीन विभाग असून तळकोकणात 13 सुभे, वरघाट 8 सुभे आणि देश 15 सुभे असे एकूण 36 सुभे आणि स्वराज्यातील 145 किल्ल्यांची यादी दिली. स्वराज्याच्या माहितीचा हा जाबता शंकराजी मल्हार या जाणकार मुघल अधिकाऱ्याने तयार केला असल्याने आणि या जाबत्यातील तपशील सभासद बखरीतील माहितीशी जुळणारा असल्याने त्या आधारे स्वराज्य विस्ताराबाबत पुढील प्रमाणे सांगता येते.

1. पूर्व किनापट्टीवर वेलोर, जिंजी, अथणी, पोर्टोनोव्हो, पाँडेचरी, नेगापट्टण व तंजावरचा काही भाग.
2. उत्तरेला रामनगरपासून दक्षिणेला बेदनूरपर्यंतची सर्व पश्चिम किनारपट्टी यामध्ये इंग्रजाच्या ताब्यातील मुंबई, सिद्दीच्या ताब्यातील जंजिरा व पोर्तुगीजाकडील गोवा याचा अपवाद होता.
3. म्हैसूरच्या पठारावर गदग, बंगलोर, श्रीरंगपट्टण.
4. देशावर बागलाण, नाशिकचा काही भाग, ठाणे, कल्याण, कुलाबा, पुणे, सातारा, चितळदुर्ग, बाळापूर, होस्कोट, कोलार हा प्रदेश होता.

**प्रादेशिक विस्तारानुसार किल्ल्यांचे प्रकार -**

मराठा साम्राज्यातील किल्ल्यांचा भौगोलिक दृष्टीने विचार करता, गिरीदुर्ग, स्थलदुर्ग (भुईकोट), जलदुर्ग आणि वनदुर्ग या चारही प्रकारातील किल्ले स्वराज्यामध्ये दिसून येतात. ज्यामध्ये राजगड, रायगड, पन्हाळा, विशाळगड ही गिरीदुर्ग. नळदुर्ग, परांडा सारखी स्थलदुर्ग. विजयदुर्ग, पद्मदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, अलिबाग, उंदेरी सारखी जलदुर्ग आणि प्रतापगडासारखे वनदुर्ग यांचा समावेश होतो.

स्वराज्याचा प्रादेशिक विस्तार पाहता प्रादेशिक विभागानुसार देखील किल्ल्याचे विविध प्रकार पडलेले आहे. ज्यामध्ये कोकण माथ्यावरील किल्ले, मावळ प्रांतातील किल्ले, घाटमाथावरील किल्ले आणि देश या प्रदेशातील किल्ल्याचा समावेह होते. ज्यांची प्राकृतिक विभागणी ही सह्याद्री पर्वत रांगेमध्ये झालेली आहे. स्वराज्यातील या किल्ल्याचे प्रकार पुढील प्रमाणे आहे.

**1. मावळ प्रदेशातील किल्ले -**

मावळ प्रदेशाच्या आश्रयाने स्वराज्याची स्थापना आणि प्रारंभीचा स्वराज्य विस्तार शिवाजी महाराजांनी केला. मावळ हा घाटमाथ्याचाच पोटविभाग होत. घाटमाथ्यालगत, देश विभागाच्या पश्चिमेस म्हणजे मावळतीस, सह्याद्रीच्या कुशीत पूर्वेकडील उतारावरील काही नद्यांच्या खोऱ्यांना मावळे व नेरे अशा संज्ञा देण्यात आलेल्या आहे. बारा मावळ जुन्नर खाली व बारा मावळ पुण्याखाली असा उल्लेख शाहीर तुळशीदासच्या पोवाड्यात आहे.

चिटणीस बखरीत मावळातील 18 किल्ल्यांची यादी दिली आहे. चिटणीस बखर ही साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज दुसरे यांच्या सेवेत असलेल्या मल्हार रामराव चिटणीस यांनी सातारच्या दप्तरखान्यातील कागदपत्रे, आख्यायिका, ऐकीव माहिती यांच्या आधारे इ.स. 1811 मध्ये लिहिली. मावळातील महत्त्वपूर्ण किल्ले म्हणजे शिवेनरी, चाकण, लोहगड, रोहिडा, तुंग, तिकोना, तोरणा इत्यादी होय.

**2. देश प्रदेशातील किल्ले -**

देश हा कोकण व विदर्भ यांना जोडणारा प्रदेश होय. नाशिक परिसरात सातमाळाच्या रांगा, औरंगाबाद परिसरात अजिंठा रांग, नगर पुणे जिल्ह्याच्या सीमेवर हरिश्चंद्ररांग, दक्षिणेत सातारा जिल्ह्यात महादेवाचे डोंगर, उस्मानाबाद लगत बालाघाटचे डोंगर तसेच गोदावरी, कृष्णा, भीमा या प्रमुख नद्यांच्या खोऱ्याचा या प्रदेशात समावेश होतो. सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर रांगेपासून पूर्वेकडे अनेक रांगा व उपरांगा पसरल्या आहेत. देश प्रदेशातील महत्त्वपूर्ण किल्ले म्हणजे चांदवड, घोडप, हातगड, वसंतगड, अहिवंतगड, कमळगड, भूषणगड, पांडवगड, अंकाई, टंकाई हे होय.

**3. घाट माथ्याच्या प्रदेशातील किल्ले -**

घाट म्हणजे देश एकमेकापासून भिन्न करणारी पर्वताची रांग, डोंगर ओलांडून जावयाचा रस्ता, डोंगरावरील वाट असा अर्थ दिला आहे. घाटमाथा म्हणजे सह्याद्री रांगेतील कळसुबाईच्या दक्षिणेकडील हरिश्चंद्र गडापासून फोंडा घाटापर्यंतचा पठाराचा प्रदेश. कोकण व देश यांचे दरम्यान असलेल्या अनेक घाटामुळे या या प्रदेशाला घाटमाथा म्हणतात. सातवाहन काळापासून घाटमाथ्याला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. या घाटमाथ्यावर कोरीव लेण्या आणि गिरिदुर्ग सुद्धा मोठ्या संख्येने आढळतात. सदर गिरिदुर्ग सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, बहामनी, शाह्या व मराठा राजवटीत बांधण्यात आले.

घाटमाथ्याची लांबी सुमारे 320 कि.मी. व रुंदी सुमारे 80 कि.मी. आहे. घाटमाथ्यावरील किल्ल्यांना शिवकाळात खूप महत्त्व प्राप्त झाले. राजगड, रायगड हे किल्ले शिवाजी महाराजांनी राजधानीकरिता निवडले आणि साल्हेर, मुल्हेर, पन्हाळा, हरिश्चंद्रगड, जीवधन, सिंहगड, प्रबळगड, शिवनेरी, राजमाची, लोहगड, तुंग, तिकोना, पुरंदर, तोरणा, रोहिडा, हातगड, गुणवंतगड, विशाळगड हे घाटमाथ्यावरील महत्वपूर्ण किल्ले होय.

**4. कोकण प्रदेशातील किल्ले -**

महाराष्ट्राच्या उत्तरेकडील दमन पासून ते दक्षिणेत तेरेखोल खाडीपर्यंत पूर्वेस सह्याद्रीपासून ते पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंत पर्यंत विस्तार असणारा प्रदेश म्हणजे कोकण होय. कोकणपट्टीचा आकार गायीच्या कानासारखा (गोकर्ण) वाटतो यावरून गोकर्ण - गोकण्ण - कोकण असे नाव प्राप्त झाले असावे. कोकणलाच अपरांत म्हणतात. कोकण प्रांताची दक्षिणोत्तर लांबी सुमारे 700 कि.मी. असून कोकणला अरबी समुद्राची 720 कि.मी. किनारपट्टी

लाभली आणि या किनारपट्टीवर प्राचीन काळापासून बंदरे आहेत. अरबांनी सातव्या शतकापासून समुद्रमार्गे कोकणाशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले. पुढील काळात समुद्रमार्गे परकीय आक्रमणाची भीती वाटू लागली. तसेच कोकणातून वर जाणाऱ्या घाटमार्ग परिसरात रहदारीवर नियंत्रण असणे गरजेचे झाले. कदाचित यातूनच मध्ययुगीन राज्यकर्त्यांनी कोकणात किल्ले बांधले असावेत असा अंदाज बांधता येतो.

सतराव्या शतकाच्या आरंभी कोकणातील समुद्रकाठचा भाग पोर्तुगीज, इंग्रज, हबशी यांनी व्यापलेला होता. जावळी जिंकल्यानंतर शिवाजी महाराजानी आपल्या राज्याच्या सीमा अरबी समुद्रापर्यंत वाढविल्या. दर्यावर्दी पाश्चात्यांचे व जंजिऱ्याच्या सिद्दीसारख्या चाच्याचे संकट निवारण्याकरिता, परदेशाशी व्यापारी संबंध वाढविण्यासाठी त्यांनी आरमाराची व जलदुर्गाची उभारणी केली. चिटणीस बखरीत कोकणातील 58 किल्ल्यांची यादी असून यामध्ये प्रतापगड, कागोरी, रसाळगड, जयगड, भिवगड, मातगड, लिंगाणा, भवानगड, मैमतगड हे प्रसिद्ध किल्ले होत. शिवाजी महाराजांनी इ.स. 1661 नंतर जलदुर्ग बांधण्यास सुरूवात केली. त्यांनी प्रथम हर्णेजवळ सुवर्णदुर्ग व मालवणजवळ सिंधुदुर्ग हे जलदुर्ग बांधले. त्यानंतर जंजिऱ्याजवळील बेटावर कांसा (कासव) म्हणजे पद्मदुर्ग व अखेरीस मुंबई बंदराच्या जवळ खांदेरी हे जलदुर्ग बांधले.

**5. कर्नाटक प्रदेशातील किल्ले -**

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली. या मोहिमेमध्ये त्यांनी चितलदुर्ग, बाळापूर, कोलार, गदग, बंगलोर, श्रीरंगपट्टण, वेलोर, जिंजी, अथणी, पोर्टोनोव्हो, नेगापट्टण, पाँडेचरी व तंजावरचा काही भाग असा एकूण 20 लाख होन उत्पन्नाचा प्रदेश जिंकला. त्या प्रदेशावर नियंत्रण राहण्यासाठी त्यांनी तेथे किल्ल्यांची बांधणी व दुरूस्ती केली. शिवाजी महाराजांच्या ताब्यात कर्नाटकातील वेलूर, कोप्पल, बेळवडी, जिंजी हे किल्ले होते.

**प्रादेशिक विस्तारानुसार किल्ल्यांचे महत्त्व -**

सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्या स्वराज्य स्थापनेत त्यांना दख्खनच्या भौगोलिक परिस्थिती फायदा झाला. या प्रदेशातील भौगोलिक, प्रादेशिक सहकार्यामुळे त्यांचे स्वराज्य भक्कमपणे उभे राहिले. शिवाजी महाराजांना स्वराज्याचा कानाकोपरा माहीत होता कारण त्यांनी हा सर्व प्रदेश अक्षरशः फिरून पाहिला होता. शिवाजी महाराजांनी आपल्या ताब्यात असलेल्या प्रदेशातील हवामान, पर्जन्य व जमीन या घटकांचा बारकाईने अभ्यास केला आणि त्यानुसार त्यांनी आपली ध्येय धोरणे राबविली ज्यामुळे ते सुराज्य निर्माण करू शकले. भौगोलिक साधन संपत्तीच्या बळावर शिवाजी महाराजांनी राज्यसंवर्धन केले. सह्याद्रीच्या डोंगर, दऱ्या, घनदाट जंगले, समुद्रकिनारा याचा उपयोग त्यांनी भुईकोट किल्ला, गिरिदुर्ग, जलदुर्ग बांधणेसाठी व युद्धनीती लष्करी डावपेच आखण्याकरिता उपयोग करून घेतला.

शिवाजी महाराजांना तिथल्या कडेकपारीची जाण होती म्हणूनच त्यांच्या प्रत्येक योजना वेळोवेळी साध्य होत पुर्णत्वास गेल्या. स्वराज्यावर आणि खुद्द स्वतःवर देखील अनेक संकटे, कठीण प्रसंग आली परंतु त्यांनी त्यावर यशस्वी मात केली; ती तिथल्या प्रादेशिक सहकार्यामुळे, तिथल्या डोंगर दऱ्यामुळे आणि भौगोलिक परिस्थितीमुळे. जसे की, स्वराज्यावर अफजलखान चालून आला तेव्हा अझलखानाला ठार करण्यासाठी प्रतापगडाच्या पायथ्याचा

आधार घेण्यात आला. पन्हाळ्याच्या वेढ्यातून स्वतःची सुटका करून घेतांना देखील त्यांना याच प्रादेशिक विभागाचे सहकार्य मिळाले.

शिवाजी महाराजांच्या भौगोलिक ज्ञानाविषयी अभ्यासक अँबे कॅरे यांनी, "Ever destined to conquer a part of the world, he had studied with extreme care everything about the duty of a General and that of a Soldier, above all fortification, which he understood better than the ablest engineers, and geography of which he had made a special study, and which he had mastered and to such an cities including the smallest township of the country extent as to know not merely all the country, but even the lands and the bushes of which he had prepared very exact chart" असे लिहिले आहे.

**निष्कर्ष -**

1. शिवाजी महाराजांनी आपल्या प्रदेशाचा भौगोलिक, प्रादेशिक दृष्टीने अतिशय सखोल अभ्यास केला होता.
2. स्वराज्यात असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण, नियोजनपूर्ण उपयोग करून घेतला.
3. शिवाजी महाराज हे संबंधित भौगोलिक परिस्थितीशी समरस झाल्यामुळे ते स्वराज्य निर्माण करू शकले.
4. मानवामध्ये असलेल्या बौद्धिक क्षमतेचा वापर करून एखाद्या दुर्गम भागात देखील नंदनवन फुलविता येते हे शिवाजी महाराजांनी सिध्द करून दाखविले.
5. वर्तमान काळात अद्ययावत तंत्रज्ञान विकसित झालेले असतात देखील महाराष्ट्रात जल दुर्भिक्ष्य निर्माण होऊन बराच भाग ओसाड झालेला आहे. परंतु शिवाजी महाराजांनी याच भागात स्वराज्य निर्माण करून त्याचे सुराज्य निर्माण केले.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. Shete, Mohan - Historical Forts in Maharashtra, Adarsh Vidhyarthi Prakashan Pune, Edition 2011.
2. अक्कलकोट, सतीश गुरुदत्त - दुर्ग (खंड - 1), सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली 2004.
3. कुलकर्णी, डॉ. अ.रा. - आज्ञापत्र, डायमंड पब्लीकेशन्स, ऑक्टोबर 2007.
4. केळकर, न.चि. (संपा.) - शिवकालीन पत्र सार संग्रह, खंड - 1, शिवचरित्र कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे. 1930.
5. घाणेकर, प्र.के. - अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती 2005.
6. जोशी, शं.ना. (संपा.) - कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, 1960.
7. तापीकर, श्रीकांत - वैभव किल्ल्यांचे, अनंत प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती, 2006.
8. पाटील, नि.रा. - किल्ले महाराष्ट्र (कोकण विभाग), सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, 2013.

9. **पिसुर्लेकर, पांडुरंग (संपा.) - मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर, खंड - 2, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1974.**

10. **वाकसकर, वि.स. (संपा.) - मंत्री दत्ताजी त्रिमळ वाकेनिविस विरचित शिवछत्रपतींची 91 कलमी बखर, श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, 1930.**

***